महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं-२०२६/सात /थेट द्वितीय वर्ष प्रवेश/E-3445524 दिनांकः-स्वाक्षरी खालीलप्रमाणे

परिपत्रक (Web-Circular)

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये फाऊंडेशन सर्टिफिकेट इन आर्ट ॲण्ड डिझाईन हा अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना तीन वर्षाच्या कला पदविका अभ्यासक्रमात थेट द्वितीय वर्षात प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची माहिती सादर करणेबाबत.

संदर्भ:- महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एडीआर-२०२६/प्र.क्र.४२/CN १७६३४७२/तांशि-६ दि. १३ ऑगस्ट, २०२६.

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वे, शासनाने फाऊंडेशन सर्टिफिकेट इन आर्ट ॲण्ड डिझाईन हा अभ्यासक्रम उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना तीन वर्ष कला पदविका अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्षात प्रवेश देण्याकरीता मंजूर प्रवेश क्षमतेच्या १०% वाढीव जागा मंजूर केलेल्या आहेत. त्या जागावर तसेच द्वितीय वर्षात तीन वर्ष कला पदविका अभ्यासक्रमात रिक्त असलेल्या जागेवर थेट द्वितीय वर्षात प्रवेश देणेबाबत मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने, ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये फाऊंडेशन सर्टिफिकेट इन आर्ट ॲण्ड डिझाईन हा सत्र पध्दतीचा अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेला आहे. त्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये तीन वर्ष कालावधीच्या कला पदविका अभ्यासक्रमास थेट द्वितीय वर्षात प्रवेश दिलेला असल्यास त्यांची माहिती ऑनलाईन पध्दतीने मंडळास तात्काळ सादर करावी. जेणेकरुन अश्या विद्यार्थ्यांना तृतीय सत्राचा परीक्षा फॉर्म वेळेत भरता येईल.

मंडळाच्या **msbae.ac.in** या संकेतस्थळावर **Higher Art Examination** या मेनू मध्ये **Higher Art Examination (Semester Pattern)** २०२६-२७ या सबमेनू मधून लॉगइन करुन **Direct second year admission data** या टॅब वरुन सदर माहिती भरावी. ज्या कला परिसंस्था सदर माहिती दि. २३.०९.२०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने मंडळास सादर करणार नाहीत, अश्या कला परिसंस्था मधील थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा मंडळामार्फत घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

याबाबत काही अडचण असल्यास, सपोर्टकरीता कु. वृषाली घोटणे मोबाईल नं- ९२८४३८१०४१ यांच्याशी संपर्क साधावा.

Digitally signed by
Vinod Rangnath Dandge
Date: 18-09-2026
14:18:52

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

प्रति,

प्राचार्य,

कला पदविका अभ्यासक्रम तीन वर्षाचे (सहा सत्र) राबविणाऱ्या सर्व कला परिसंस्था

प्रत-

१. मा. कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. निवड नस्ती